MHST060002002025

**नि.दि.मु.क्र. ७७/२०२५**

**सोनाबाई दादा कावळे**

**विरुध्द**

**नवनाथ काशिनाथ दाइगडे**

**निशाणी क्र. ०५ वरील आदेश**

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीविरुध्द त्यांच्या मिळकतीच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये यासाठी तात्पुरता मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केला आहे.

०२. वादीच्या कथनाप्रमाणे मौजे गोंदवले बुद्रुक, ता. माण, जि. सातारा येथील सि.स.क्र. ४२६ मध्ये घर मिळकत क्र. २१ यांसी क्षेत्र १८६ चौ.मी. ही वादग्रस्त मिळकत आहे. सदर मिळकतीस संक्षेपाकरीता यापुढे **''वाद मिळकत''** असे संबोधण्यात येईल.

०३. वादीने असे कथन केले आहे की, वाद मिळकत ही वादीची वडिलार्जित मालकी हक्काची व कब्जेवहिवाटीची मिळकत आहे. सदर वाद मिळकत ही वादीचे पती मयत दादा कावळे यांच्या नावावर होती. ते मयत झाल्यानंतर वादी, विजय कावळे, मिलींद कावळे व माधुरी दडस यांची नावे वारसा हक्काने नोंद झाली. सदर वाद मिळकत ही वादीचे सासरे पांडुरंग कावळे यांच्या नावावर असल्याबाबत सन १९९७–९८ चा घर मिळकतीचा ८–अ चा उतारा वादीने दाखल केला आहे. प्रतिवादीचा वाद मिळकतीमध्ये कोणताही अधिकार नाही. वादी ही विधवा स्त्री असून ती एकटी गोंदवले बुद्रुक येथे कायम वास्तव्यास आहे. प्रतिवादी हा वादीच्या कब्जेवहिवाटीस हरकत–अडथळा करीत आहे. दि. २७.०१.२०२५ रोजी प्रतिवादीने वादीला धमकी दिली. तसेच, तिच्या ग्रामपंचायतमधील नोंदीबद्दल आक्षेप घेतला. प्रतिवादी हे वादीच्या वहिवाटीस हरकत–अडथळा करीत असल्यामुळे वादीने सदरचा अर्ज दाखल केला आहे.

०४.  प्रतिवादीने निशाणी १३ प्रमाणे म्हणणे दाखल केले व वादीचा संपुर्ण दावा नाकबुल केला आहे. वादीने वाद मिळकतीच्या खोटया चतुःसिमा नमुद केल्या आहेत. ग्रामपंचायत मिळकत क्र. २१ चा सि.स.क्र. ४३६ हा चुकीचा नमुद केला आहे. ग्रामपंचायत मिळकत क्र. २१ ही अस्तित्वात नाही. वाद मिळकत ही वादीची वडिलापार्जित मालकी हक्काची व कब्जेवहिवाटीची नव्हती. वाद मिळकतीस दादा कावळे यांच्या असलेल्या वारसांची नोंद ही बेकायदेशीर आहे. वादीला मुली आहेत व ती शेजा–यांशी सतत वाद करीत असतात. वादीने सदरचा अर्ज हा प्रतिवादीस त्रास देण्यासाठी दाखल केला आहे. वादीची वाद मिळकतीमध्ये कब्जेवहिवाट नाही. त्यामुळे प्रतिवादीने वादीला हरकत–अडथळा करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. वाद मिळकत ही बापु कावळे यांची होती. त्यांचा वंश न वाढल्यामुळे त्यांनी दादा कावळे यांचे नाव वारस म्हणून त्या मिळकतीला लावले. सदर मिळकत दादा कावळे यांनी प्रतिवादीचे वडिल काशिनाथ डांईगळे यांना खुश खरेदीपत्राने दिली. सदर जागेची नोंद ग्रामपंचायतीला खरेदीपत्रापासून होती व आहे. दि. २१.११.१९८९ रोजी दादा कावळे यांनी सर्व्हे क्र. ४३७ मधील खुली जागा शामराम शिंगाडे यांना खरेदीदस्ताने दिली. प्रतिवादीच्या वडिलांना विकलेली मिळकत व मधुकर विरकर यांना विकलेली मिळकत यांचा सिटी सर्व्हे क्र. ४३७ असा आहे. मात्र, सिटी सर्व्हे होत असतांना प्रतिवादीचे कुटूंब गोंदवले गावापासून दोन कि.मी. अंतरावर राहत असल्याने प्रतिवादीच्या नावाची नोंद सिटी सर्व्हे अभिलेखात झाली नाही. प्रतिवादीचे वडिल अशिक्षित असल्यामुळे त्यांच्या खरेदीपत्राची नोंद करण्याचे राहून गेले. सिटी सर्व्हे रेकॉर्डला प्रतिवादीच्या नावाची नोंद नसल्यामुळे वादी त्याचा गैरफायदा घेत आहे. ग्रामपंचायत दप्तरी प्रतिवादीच्या क्षेत्राची नोंद आहे. ग्रामपंचायतीची घरपट्टी व पाणीपट्टी प्रतिवादी भरत आलेले आहेत. वादीला तुर्तातुर्त ताकीद मागण्याचा अधिकार नाही. त्यामुळे वादीचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०५. उभयतांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी आपआपले अर्ज व म्हणणे यांच्या अनुषंगाने युक्तिवाद केला. तसेच, अभिलेखावर दाखल असलेल्या कागदपत्रांचा ऊहापोह केला. प्रकरणाची परिस्थिती पाहता खालील मुद्दे माझ्या निष्कर्षासाठी काढण्यात आले व त्याची कारणमिमांसा खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीच्या बाजूने प्रथम दर्शनी दावा आहे काय ? | **... होय.** |
| २. | दाव्याचा तौलन कौल वादीच्या बाजुने आहे काय ? | **... होय.** |
| ३. | तुर्तातुर्त मनाई आदेश न केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे काय ? | **... होय.** |
| ४. | आदेश काय ? ......................................... अंतिम आदेशाप्रमाणे | |

**–: का र ण मि मां सा :–**

**मुद्दा क्र. १ ते ३ :–**

उपरोक्त मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने ते एकत्रितपणे चर्चीले जात आहेत.

०६. वादीच्या कथनाप्रमाणे वाद मिळकत ही तिच्या पतीची वडिलार्जित मिळकत होती व त्यांच्या मृत्यूनंतर वादी व तिच्या मुलांची नावे सिटी सर्व्हे रेकॉर्डला आली. प्रतिवादी हे वादीच्या शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत –अडथळा करीत असल्यामुळे वादीने सदरचा अर्ज दाखल केला आहे. याउलट, प्रतिवादीने असे कथन केले आहे की, मयत दादा कावळे म्हणजेच वादीचे पती यांनी सदर वाद मिळकत प्रतिवादीच्या वडिलांना खरेदीदस्ताने विक्री केली आहे.

०७. वादी व प्रतिवादी यांनी त्यांची वाद मिळकतीवर मालकी व कब्जेवहिवाट असल्याचे कथन केले आहे. त्यांनी आप–आपल्या कथनांना सहाय्य करण्यासाठी कागदपत्रे देखील दाखल केली आहे. वादीने तिची मालकी दाखविण्यासाठी सिटी सर्व्हेचा उतारा, नकाशा, चौकशी नोंदवहीचा उतारा इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत. प्रतिवादीने त्यांची मालकी दाखविण्यासाठी वाद मिळकतीचा ग्रामपंचायतीचा ८–अ उतारा, खरेदीपत्र व अर्ज इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत.

०८. सदर वाद मिळकतीवर कोणाची मालकी आहे हे दावा गुणदोषावर चालल्यानंतर शाबीत होईल. परंतू, तात्पुरत्या मनाई आदेशासाठी वाद मिळकत ही वादीच्या ताब्यात आहे का व प्रतिवादी वादीच्या ताब्यास हरकत अडथळा करीत आहेत काय हे वादीने प्रथमदर्शनी शाबीत करणे गरजेचे आहे. प्रतिवादीने वादीचा वाद मिळकतीवर असलेला ताबा नाकारलेला आहे. त्यांच्या कथनाप्रमाणे वाद मिळकत ही वादीच्या ताब्यात नाही. वादीने तिचा ताबा शाबीत करणेसाठी भानुदास आण्णा कावळे व प्रभावती संपत कात्रे यांचे प्रतिज्ञापत्रे दाखल केली आहेत. त्यांच्या कथनाप्रमाणे वाद मिळकत ही वादीच्या ताब्यात आहे. भानुदास कावळे यांनी असे कथन केले आहे की, ते वाद मिळकतीच्या शेजारी राहतात व वाद मिळकतीवर ते वादीच्या संमतीने त्यांची जरशी जनावरे बांधत आहेत. प्रतिवादी यांची वाद मिळकतीवर कधीही मालकी व कब्जेवहिवाट नव्हती. प्रभावती कात्रे यांनी असे कथन केले आहे की, वाद मिळकत ही वादीच्या ताब्यात आहे व प्रतिवादीचा वाद मिळकतीशी कोणताही संबंध नाही. वादीने दाखल केलेल्या मालमत्ता पत्रकामध्ये वादीच्या नावाची नोंद दिसून येत आहे. प्रथमदर्शनी वाद मिळकत ही वादीच्या ताब्यात असल्याचे दिसून येत आहे. प्रतिवादीने त्याच्या कब्जाबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. वादीने सदरचा दावा दाखल करतांना दाव्यास कारण म्हणून दि. २७.०१.२०२५ रोजी प्रतिवादीने वादीच्या वाद मिळकतीवरील कब्जेवहिवाटीस हरकत–अडथळा केल्याचे शपथेवर कथन केले

आहे. त्यामुळे वाद मिळकती संदर्भात प्रथमदर्शनी केस, दाव्याचा तौलन कौल वादीच्या लाभात असल्याचे दिसून येत आहे. वादी अथवा वादीच्या वतीने जी व्यक्ती वाद मिळकतीची ताबेधारक आहे, त्यांचा ताबा दावा प्रलंबित असेपावेतो कोणीही घेतल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब, वादी मनाई हुकूम मिळणेस पात्र आहे. त्यामुळे वादीचा अर्ज मंजूर करणे उचित होईल. सबब, मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदविणेत येत आहेत व मुद्दा क्र. ४ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

**आ दे श**

१. प्रस्तुतचा अर्ज (निशाणी ५) मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादीने अगर त्याच्या मार्फत इतर त्रयस्थ इसमांनी दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो वाद मिळकतीमधील वादीच्या कब्जेहिवाटीस हरकत–अडथळा करु नये असा तात्पुरता मनाई हुकूम वादीच्या लाभात देण्यात येत आहे.

सही/–

**(एस.एस. गाडवे)**

दिनांक : १३.०३.२०२५. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, दहिवडी.

**–: प्र मा ण प त्र :–**

सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजुकरातील शब्द न् शब्द मुळ आदेश/न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | ए.एन. ओंबासे, लघुलेखक ग्रेड–३, |
| न्यायालयाचे नाव | : | दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दहिवडी, ता. माण, जि. सातारा. |
| आदेश/न्यायनिर्णय घोषित केल्याचा दिनांक | : | १३.०३.२०२५ |
| आदेश/न्यायनिर्णयावर स्वाक्षरीत | : | १३.०३.२०२५ |
| सी.आय.एस. प्रणालीमध्ये अपलोड केल्याची तारीख | : | १३.०३.२०२५ |